भारती विदयापीठ पोलीस ठाणे,पुणे.
दिनांक –०८ /०१ /२०१८

- प्रेसनोट –

पुणे शहरातुन वाहन चोरी करण्यास अटक ६ दुचाकी जप्त.

---

--

दिनाक.०८/०१/२०१८ रोजी भारती विदयापीठ पोलीस स्टेशनच्या हददीत पोलीस उपनिरिक्षक दत्तात्रय मोहिते व तपास पथकातील कर्मचारी हे पेट्रोलिंग करित असताना तपास पथकातील पोलीस कर्मचारी सर्फराज देशमुख यांना त्याच्या बातमीदारामार्फतीने बातमी मिळाली की, कात्रज दुधडेअरी जवळ एक इसम काळया कलरचे टी शर्ट घातलेला असुन त्याच्याकडे चोरी केलेली ॲक्टीव्हा मोटार सायकल आहे. व तो सदर ठिकाणी उभा आहे. सदर ठिकाणी सापळा रचुन शिवा उर्फ हरिष गणेश पोरे, उर्फ अर्जित अमित जैन, वय १९ वर्षे सध्या रा. पुणे फिरिस्ता, मुळ रा. उत्तराखंड यास पकडण्यात आले आहे.

हरिष गणेश पोरे हा रेकार्ड वरिल गुन्हेगार असल्याने त्याच्याकडे अधिक तपास करता त्याने मोटार सायकल चोरी केल्याबाबत सांगितल्याने त्यास अधिक विश्वासात धेवुन त्याच्याकडे तपास करता त्यानी भारती विदयापीठ परिसर,स्वारगेट,डेक्कन,लोणावळा परिसरातुन मोपेड दुचाकी चोरल्याचे कबुल केले.

सदर आरोपी यांच्याकडुन ४ ॲक्टिवा, २ ज्युपिटर अश्या एकुण ०६ गाडया हस्तगत करण्यात आल्या असुन भारती विदयापीठ पोलीस ठाणे कडील ३ गुन्हे, डेक्कन पोलीस ठाणे १ गुन्हे,स्वारगेट पोलीस ठाणे १ गुन्हे,लोणावळा पोलीस ठाणे १ गुन्हा असे एकुण ०६ गुन्हे व २,००,०००/- रु किमतीच्या गाडया जप्त करण्यात आल्या आहेत.

सदर आरोपी हा रेकार्ड वरचा असुन त्याच्यावर यापुर्वी सहकारनगर,भारती विदयापीठ, पोलीस स्टेशन येथे गुन्हे दाखल आहेत.

सदर कामगिरी परिमंडळ २ पुणे चे पोलीस उपायुक्त श्री प्रविण मुंढे सो, सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. शिवाजी पवार सो यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कमलाकर ताकवले, पोलीस निरीक्षक(गुन्हे) राजकुमार वाघचवरे तसेच तपास पथकाचे पोलीस उपनिरिक्षक दत्ताजीराव मोहिते सो कर्मचारी चंद्रकांत फडतरे,कृष्णा निढाळकर,सर्फराज देशमुख, अमोल पवार, उज्वल मोकाशी, कुंदन शिदे, अभिजीत रत्नपारखी, शिवदत्त गायकवाड गणेश चिंचकर, यांनी केलेली आहे.